Edit with WPS Office

**वाजिद-** मरण आयुष्यातील सगळ्यात मोठी गोष्ट आहे, पण मेल्यानंतर लोक नक्की जातात कुठे? या माहिती नसलेल्या प्रवासाला काही अंत आहे? जिथे आयुष्यातील चांगल्या-वाईट गोष्टींचा हिशेब होतो? तर उत्तर आहे "हो"; आणि मी हे स्वानुभवातून सांगतोय, कारण मी आता माझ्या आजूबाजूला जे काही बघत होतो ते हेच तर आहे; मरणानंतरचं दुसरं जग. आत्ता थोडा वेळ म्हणजे काही चार पाच तास झाले असतील, मी या जगात आलो; पण मला अजून कळत नाहीये की हे सगळं खरंच आहे की स्वप्नं? गुलाबी आकाश, धुकं पडल्यासारखी जमीन, एकत्र चमकत असलेले चंद्र-सूर्य आणि या सर्वांमध्ये प्रचंड असा लोकसमुदाय. जीवनभर मी ज्या जगाला कधीच मानलंच नाही, ज्याला मी लोकांच्या कल्पना समजत होतो; त्याच जगात आज मी उभा आहे. आज मला आठवत होतं ते म्हणजे माझ्या आजी आजोबांचे संस्कार, त्यांचे सल्ले, पण आता तर उशीर झाला होता. खाली खऱ्या जगात माझ्या घरात रडण्याचे आवाज वाढत होते. माझ्या घरी अंगणात नातेवाईक शेजारी उदास चेहरे घेऊन बसले होते. शेजारचे कामत काका त्यांच्या घरातून बाहेर बसलेल्या लोकांसाठी चहाची व्यवस्था करत होते.

**(खऱ्या जगात)**

**सावंत-** माणूस म्हणून चांगले होते खरंतर वाजिदशेठ काय पिस्तोनजी. **(चहावाल्या कडे बघत)**

**पिस्तोनजी-** अरे मानस चांगलाच होता, पण दिन-धरमचा थोडा कच्चा होता. माझ्यासंग फिरायला यायचा, पण आज माझ्या कन्ध्यावर...**(रडत)** सावंत पण याला कुठं न्यायचा कबरस्तान या समशान?

**सावंत-** आता नास्तिक माणसाला काय कबरीस्तान आणि काय स्मशान. मृत्युपत्रात सर्वात शेवटी लिहिलं आहे की, बॉडी दवाखान्यात मेडिकल रिसर्च साठी देण्यात यावी. **(पुन्हा चहावाल्याकडे बघत)** ए पोरा चहा देतोय, की मी जाऊ? हो न तर, केव्हाचं आपलं त्याच्याकडे बघतोय.

**(वाजिदच्या जगात)**

**वाजिद-** अरे हो, ते तर तुम्हाला सांगायचंच राहिलं; माझ्या आई-वडिलांचं इंटर रिलिजन लग्न झालं होतं. आईची आई सांगायची, "वाजिद, अरे नमाज का वक्त बीत रहा है, कमबख्त मारे टीव्ही बंद कर दे।" आणि वडिलांची आई सांगायची, "पूजा न करता परीक्षा द्यायला जातो आहे, अरे वाजिद ऐक पेपरवर ओम लिहून सुरुवात करशील." पण मला जशी समज येत गेली, तसं मी हे धर्म वगैरे मानणं सोडून दिलं आणि स्वतःला **"नास्तिक"** घोषित करून मोकळा झालो. परंतु माणसं जमवायला मला आवडायचं; सगळ्यांची मदत करणं, सगळ्यांवर प्रेम करणं, यावर माझा विश्वास होता. जेव्हा आमच्या एरियातील पंडितजी किंवा मौलवी साहेब मला धर्माचं ज्ञान द्यायचे; तेव्हा मी सांगायचो या सगळ्या कल्पना आहेत, माणूस गेल्यानंतर काही होत नाही. एकदा डोळे बंद झाले की, मूव्ही संपली. हे जग जे काही आहे इतकंच आहे. पण आज मी जेव्हा त्या नरकाच्या आणि जहन्नुम च्या दरवाज्यावर एका भयानक माणसाला बघत होतो तेव्हा मला दिसत होतं की, माझ्या फिल्ममध्ये THE END नंतर सुद्धा खूप ॲक्शन बाकी आहे. इथे उभा मी इतर लोकांकडे टक लावून बघत होतो. समोर एक मोठा दरवाजा होता, ज्यावर मोठ्या अक्षरात "WELCOME" लिहिलं होतं आणि त्या दरवाजासमोर लोकांची लांब रांग होती. सर्वांच्या हातात एक कागद होता, ज्यावर एक खास नंबर होता; पण गर्दीत आवाज आणि गोंधळ इतका होता की, कोणाचंच कोणाकडे लक्ष नव्हतं. तेवढ्यात समोरून एक सडपातळ माणूस मला येताना दिसला. मी त्याला म्हणालो, "एक मिनिट एक्सक्युज मी.."

**माणूस-** हा बोला.

**वाजिद-** इथली नेमकी सिस्टीम कशी आहे? मी आत्ताच आलो आहे; त्यामुळे नेमकं काय करायचं? ते समजत नाही. नक्की काय करावं लागेल मला?

**माणूस-** अच्छा, न्यू ॲडमिशन. त्या बेंचवर बसा कोणीतरी येऊन फॉर्म देईल; त्यावर नंबर आला की तुम्हाला सांगितलेल्या जागेवर जा.

**वाजिद-** पण मी तर...

Edit with WPS Office

**माणूस- (वैतागून)** जेवढं सांगतोय तेवढं करा. सीनियर प्रेतासोबत वाद घालू नका. एक तर आधीच वैतागलोय मी, आता ते सांगतात की, या नंबरला पाप-पुण्याच्या रजिस्टर सोबत लिंक करा. त्यात जातीच्या आणि धर्माच्या कागदांची पूर्तता करा. अजब मॅनेजमेंट आहे..

**वाजिद-** त्याने ओरडून सांगितल्यावर मी गप्प जवळ असलेल्या एका बेंचवर बसलो. तिथे आधीच बरेच लोक बसले होते; बसलेल्या एका व्यक्तीने मला विचारलं..

**व्यक्ती-** काय.. इकडे कसं येण केलंत?

**वाजिद-** तब्येत थोडी खराब होती, खूप इलाज केला पण; फायदा झाला नाही. जाऊद्या, तुम्ही कसे आलात?

**व्यक्ती-** मी एकदम क्रांतिकारी माणूस. वरच्याची शपथ घेतली होती की, मरेन तर क्रांतीकार्यातच मरेन. आंदोलनात जीव देईल. जेलमध्ये फाशी घेऊन मरेन.

**वाजिद-** अच्छा, तर फाशी झाली तुम्हाला!

**व्यक्ती- (शरमेने)** नाही.. खरंतर मी झोपलो होतो तेव्हा, पंखा पडला डोक्यात.

**वाजिद-** त्या व्यक्ती प्रमाणेच इथे बसलेल्या सर्व लोकांची त्यांच्या मरणा विषयीची एक गोष्ट होती, पण सगळ्यांमध्ये एक गोष्ट मात्र समान होती; ती म्हणजे सगळे धार्मिक, देवभोळे लोक होते. त्यामुळे सगळ्यांना ही खात्री होती की, ते स्वर्ग किंवा जन्नत मध्ये जातील. पण मी मात्र काळजीत होतो; तेवढ्यात समोरून काळ धोतर नेसलेला एक माणूस हातात रजिस्टर घेऊन येताना मला दिसला. त्याच्या गळ्यात एक बिल्ला होता. त्यावर लिहिलं होतं "स्टाफ". तो जवळ आल्या आल्या सर्व लोक अगदी शांत बसले. तो सर्व लोकांना काहीतरी सांगत होता..

**स्टाफ-** सगळे तयार आहात तर? घ्या सगळ्यांनी हा फॉर्म भरा. (एक एक कागद सगळ्यांना देत)

**वाजिद-** हा फॉर्म पाहून इतर लोक तर समाधानी होते; पण मी मात्र घाबरलो होतो. त्या फॉर्मच्या वर लिहिलं होतं "या तुमचीच वाट पाहत आहोत" आणि खाली लांबलचक नियमावली होती. फॉर्म बघितल्यावर एक गोष्ट मला लक्षात आली होती की, पृथ्वीवर वरच्याच्या नावावर जे काही दंगे, गोंधळ होतात; ज्या काही लढाया, भांडणं होतात ते सर्व निरर्थक आहे, कारण फॉर्ममध्ये तर सर्व धर्मांना, जातींना आणि प्रार्थनेच्या पद्धतींना अगदी समान दर्जा देण्यात आला होता; म्हणजे शेवटी सर्वांना जायचं एकाच ठिकाणी होतं. त्यावर बरीच नावं होती, जो वरच्याला ज्या नावानी मानत असेल, त्यासमोर टिक करायचं होतं. मला मात्र कळत नव्हतं की टिक कुठे करायचं, कारण तिथे "नास्तिक" नावाचा ऑप्शनंच नव्हता. हे विचारण्यासाठी मी स्टाफ जवळ एक जनरल विषय काढला. मी स्टाफला म्हणालो, "ही भिंत थोडी गरम आहे तिकडे? स्टाफचं किचन वगैरे आहे का?"

**स्टाफ- (वर बघत)** नाही.. नरक आणि जहन्नूमसाठी आणलेला ताजा लावा सप्लाय होतो आहे.

**वाजिद-** जेव्हा त्याने हे उत्तर दिलं, तेव्हा मी फार घाबरलो. तरीही मी शोधत होतो, कुठे "नास्तिक" असा ऑप्शन दिसतो का ते. याशिवाय देखील तिथे बरेच प्रश्न होते, सांगायचं झालं तर; नाव, पत्ता, पृथ्वी सोडण्याची तारीख, दारू प्यायली आहे की नाही?, दुसरी कुठली नशा केली आहे का?, कोणाला धोका तर दिला नाही ना?, खाली काही आणखीन प्रश्न दिले होते; कदाचित ते या मागच्या दोन तीन वर्षातंच टाकले असावे, म्हणजे सोशल मीडियावर कोणाला शिवीगाळ केला आहे का?, कोणाबद्दल वादग्रस्त विधान केलंय का?, कुठल्या पक्षासाठी कार्यकर्ता बनून रस्त्यांवर दंगे केले आहेत का?, कुठल्यातरी जातीय किंवा धार्मिक दंगलीत सहभाग घेतला आहे का? असे बरेच. मी ते सगळे प्रश्न वाचत होतो. तेवढ्यात स्टाफवाला माणूस माझ्याजवळ आला आणि बोलला..

**स्टाफ-** तुम्ही फॉर्म का भरत नाही आहात?

Edit with WPS Office

**वाजिद-** नाही.. ते actually ते विचारत आहेत की, तुम्ही वरच्याला कसे मानायचे?

**स्टाफ-** हो तर.. टिक करा ज्याला मानत होते त्यासमोर.

**वाजिद- (थोडं घाबरून)** माझा तोच प्रॉब्लेम आहे, मी कोणालाच मानत नाही आणि आजपर्यंत कोणाची पूजाही केली नाही.

**स्टाफ- (आश्चर्याने)** काय कुणालाच मानत नाही?

**वाजिद-** नंतर त्या स्टाफवाल्या माणसाने माझी सगळी हकीकत ऐकून घेतली आणि लगेच त्याच्या जवळच्या कॉर्डलेस वरून एक फोन लावला. तो काय बोलत होता हे तर मला कळलं नाही; पण त्याचे हावभाव सांगत होते की, मी कुठल्या तरी मोठ्या अडचणीत सापडलोय. त्याचा फोन झाल्यावर चार-पाच लोक माझ्याजवळ आले. त्यांची पुरती तारांबळ उडाली होती, म्हणजे सरकारी ऑफिस मधल्या लोकांना कसं, एखाद्यावेळी अचानक खूप काम करताना कशी फजिती होते; तसंच इथे सुरू होतं. सगळे आपापल्या लॅपटॉप मध्ये रूलबुक काढून माझ्यासाठी कुठला रूल सूट होतो, ते बघत होते. त्यातील त्यांचा बॉस मला म्हणाला,

**बॉस-** चला माझ्याबरोबर

**वाजिद-** मला नेमकं घेऊन कुठे जाताय तुम्ही?

**बॉस- (वैतागून)** गप्प बसा. आधीच पूर्ण वर्षात करावं लागत नाही, तेवढं काम तुमच्यामुळे करावं लागतंय. गपचूप माझ्याबरोबर चला. तुम्हाला हायर ऑथोरिटीकडे नेण्यात येत आहे.

**वाजिद-** आम्ही ज्या रस्त्याने जात होतो, तो रस्ता एका नदीतून आणि थेट एका संगमरवराच्या दगडाकडे जात होता. एकीकडे आकाश निळे तर दुसरीकडे धुरासारखे काळे होते. एकीकडचं पाणी इतक साफ आणि स्वच्छ होतं की आत असलेले मासे सुद्धा पोहताना दिसत होते आणि दुसरीकडील पाणी घाण आणि दुर्गंधी असलेलं होतं; ज्यात प्लास्टिक, कचरा, रिकाम्या बाटल्या आणि अजून बरंच काही होतं. तिथून त्या बॉस ने मला एका केबिनमध्ये आणलं आणि मला म्हणाला,

**बॉस-** बसा. आता इथून हे सर तुमच्याशी बोलतील.

**सर- (टेबल वरील सर्व धर्मांचं एक एक पुस्तक स्टाफला देत)** तर मिस्टर वाजिद तुम्ही म्हणत होतात की, यापैकी कुठल्याच पुस्तकावर तुमचा विश्वास नाही.

**वाजिद- (घाबरून; खाली मान घालून)** नाही..

**सर-** पण असं कसं? तुम्हाला काय वाटतं हे जग जादूने चालतं?

**वाजिद-** सॉरी सर, पण माझा जर जादूवर विश्वास असता तर यापैकी एखादं पुस्तक मी नक्की वाचलं असतं. त्याचं कारण म्हणजे तुम्ही जी पुस्तक मला दाखवत आहात, याच पुस्तकांना एका पेक्षा वरचढ ठरवण्यासाठी पृथ्वीवर सगळे एकमेकांविषयी राग आणि तिरस्काराची भावना बाळगतात; पण इथे तर सगळे सारख्या पातळीवर आहेत. मला वाटायचं जग हे फक्त परोपकार, प्रेम यावरंच सुरु आहे.

**सर- (हैराण होऊन बघत)** असो.. या जगात दोन भाग आहेत. एका भागात त्यांना ठेवतात जे वरच्यावर प्रेम करतात आणि दुसऱ्या भागात त्यांना ठेवतात जे वरच्याचा राग करतात; समजलं? तुमच्या केस साठी आपण एकदा वरती शेवटचे बोलून बघूया. कदाचित तुमचा एक्झिट इंटरव्हयू होईल, त्यानंतर तुमची जागा ठरवली जाईल.

**वाजिद-** एक्झिट इंटरव्हयू? कोणासोबत?

Edit with WPS Office

**सर– (हसत)** "वरच्या" सोबत.

**वाजिद–** इथल्या लोकांचं आपापसात संभाषण झालं आणि माझा एक्झिट इंटरव्हयू मान्य करण्यात आला. मला एकट्याला पुढे पाठवण्यात आलं. मी त्याच रस्त्याने जात होतो जो त्या संगमरवराच्या दगडापाशी संपत होता; पण जवळ गेल्यावर मला समजलं तिथे जिना होता. मी उजवीकडे बघितलं तर एक मनमोहक बगीचा होता.  जिथे लोक हसत होते, आनंदी होते, निळशार आकाश, हिरवीगार जमीन, शुद्ध हवा आणि अतिशय मोहक वातावरण होतं. स्वर्ग की जन्नत ते जे काय म्हणतात ते हेच तर होतं. मला तिथेच कळलं की ही जागा माझ्यासाठी नाही मी उदास होउन  पुढे जात होतो. थोडं पुढे गेल्यावर अचानक एक गरम वाऱ्याचा झोत माझ्या चेहऱ्यावर आला. मी डावीकडे बघितलं तर माझा विश्वासंच बसत नव्हता; तिथे काळकुट्ट आकाश, पायाला चटके बसतील अशी गर्र्म जमीन आणि लोकांवर अत्याचार करणारी काही माणसे होती. अत्याचार म्हणजे भयानक अत्याचार. तिथे असलेल्या काही लोकांना खिळे असलेल्या खुर्चीत बसवलं जात होतं; तर काहींना बर्फाच्या लादीवर बांधून एका अशा माणसाकडून चाबकाचे फटके दिले जात होते जो सतत अंक विसरत होता. अर्थातच हा नरक आणि जहन्नूम चा भाग होता. आता मला खरच भीती वाटत होती; कारण इथेच तर यायचं होतं मला. अखेर तो जिना आला. मी घाबरत पुढे गेलो. काही पायऱ्या चढल्यानंतर एक केबिन दिसली. पडदे टाकलेल्या त्या केबिन मधून डोळे उघडता न येणारा प्रकाश येत होता. बाजूला एका बोर्डवर लिहिलं होतं "वरचं डिपार्टमेंट" मी कसाबसा डोळे चोळत आत  गेलो. तितक्यात मला एक आवाज आला, "या या मी तुमचीच वाट पाहत होतो. तो वरचा जो कोणी म्हणतात तो मीच." त्या भारी आवाजाने माझी भीती अजुनंच वाढली. दोन्ही आज्यांची शिकवण आठवायला लागली, एरिआमधल्या पंडित आणि मौलवींचं ऐकलं असतं, तर आज ही वेळ आली नसती; पण आता खूप उशीर झाला होता. त्या केबिनच्या प्रकाशात मी खूप प्रयत्नांनी डोळे उघडत होतो, पण प्रकाश इतका विलक्षण होता की, ते लगेच बंद होत होते. मी त्यांना म्हणालो, "मी... मी...खरंच I am sorry..मला वाटलं.."

**वरचा–** काय वाटलं? तुला वाटत होतं की माझं अस्तित्वंच नाही; म्हणजे ही जमीन, हे आकाश, ही हवा हे सगळे स्वतःहून निर्माण झालंय? काय?

**वाजिद–** मला माफ करा. मला खरंच कल्पना नव्हती. सॉरी माझ्यामुळे तुमच्या स्टाफला पण खूप त्रास झाला.

**वरचा– (हसत)** खरंतर ती त्यांची चूक आहे. खूप आधी त्या फॉर्ममध्ये नास्तिकांसाठी एक ऑप्शन होता; पण माझ्या भीतीने त्या ऑप्शन समोर कोणी टिक करतच नव्हतं. त्या नास्तिक लोकांना जेव्हा कळायचं की मी खरंच आहे, तेव्हा ते चतुराई दाखवत लगेच कुठल्यातरी एका ऑप्शनवर टिक करायचे. मग स्टाफने तो ऑप्शनंच काढून टाकला; पण तू असं नाही केलंस. तू अगदी माझ्यापर्यंत येईस्तोवर प्रामाणिक राहिलास. वेल डन वाजिद..

**वाजिद– (थोडं घाबरूनंच)** पण माझ्या प्रामाणिकपणाचा काय उपयोग? ही चांगली जागा म्हणजेच स्वर्ग आणि जन्नत तर फक्त त्यांच्यासाठी आहे, जे तुमच्यावर प्रेम करतात; आणि मी तर तुम्हाला मानतंच नव्हतो.

**वरचा–** तू मला मानत नव्हतास त्याचा अर्थ हा नाही, तुझं माझ्यावर प्रेम नव्हतं. मानणं आणि प्रेम करणं यात फरक आहे वाजिद.

**वाजिद–** पण मला वाटायचं तुमचं अस्तित्वंच नाही. मी माझ्या आयुष्यात कधीही पूजा, नमाज काहीच केलं नाही.

**वरचा–** तुला माहितीये का की, पूजा, इबादत, नमाज म्हणजे काय? हे सगळं ते नाही; जे तुम्ही समजता. वाजिद आम्ही माणसाला इथे या गोष्टी वर जज नाही करत, की तो मला किती मानतो; तर यावर करतो, की तो जिवंतपणी लोकांसाठी काय करतो. आपापसात किती प्रेमाने राहतो. आपापल्यात प्रेम वाटणं म्हणजेच माझ्यावर प्रेम करणं. मला पूजा, इबादत हवं असतं तर मी स्वतः पृथ्वीवर आलो असतो. मला समोर बघून तर सर्वांनीच माझी पूजा केली असती; पण प्रेम ही माणसाची गरज आहे आणि म्हणून मी प्रत्येक माणसाच्या रूपात पृथ्वीवर आहे. अर्थात तुला कळलं असेलच, तुला कुठे पाठवलं जाणार आहे ते.

**वाजिद–** त्यावेळी माझे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. कदाचित पृथ्विवरील लोक हे समजू शकले असते की  आपापसात प्रेमाने राहणं म्हणजेच देवावर प्रेम करणं आहे; कारण परमेश्वर हा माणसातंच आहे शेवटी. त्या इंटरव्हयू नंतर काहीच वेळात

Edit with WPS Office

मी त्याच हिरवीगार जमीन, निळेशार आकाश असलेल्या ठिकाणी शांततेत बसलो होतो. आनंद तर होताच पण, जास्त आनंद याचा होता की, सुरुवातीला देण्यात येणाऱ्या फॉर्मवर **"नास्तिक"** नावाचा ऑप्शन पुन्हा टाकण्यात आला होता.